12 SEP 2026
पुढारी



# जेन झीने उपजत गुणवत्तेतून इनोव्हेशन व स्टार्टअपनिर्मिती करावी : डॉ. कामत

**उचगाव :** जेन झीने आपल्या क्षमतांचा उपयोग नवनिर्मिती व स्टार्टअपसाठी करावा आणि टीमवर्कसाठी भावनांक व बुद्ध्यांक वाढवावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांनी केले. येथील न्यू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये डिप्लोमा व डिग्री इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांच्या 'दीक्षारंभ' सोहळ्यात ते बोलत होते.

प्रमुख मार्गदर्शक उद्योजक संजय पेंडसे यांनी 'विकसित भारत २०४७'मधील अद्ययावत तंत्रज्ञानावर प्रकाश टाकत 'नोकरी मागणारे नव्हे, तर देणारे बना,' असा कानमंत्र दिला. संस्थेचे अध्यक्ष बी. जी. बोराडे व चेअरमन डॉ. के. जी. पाटील यांनी कोल्हापूरचा औद्योगिक वारसा पुढे नेण्याचे आवाहन केले. प्राचार्य डॉ. संजय दाभोळे यांनी कौशल्य विकासाची भूमिका मांडली.

प्रास्ताविक प्रा. मोहन शिंदे, सूत्रसंचालन प्रा. संग्रामसिंह पाटील तर आभार प्रा. सुहासचंद्र देशमुख यांनी आभार मानले. कार्यक्रमास संस्थेचे व्हाईस चेअरमन डी. जी. किल्लेदार, खजानीस वाय. एस. चव्हाण, संचालक वाय. एल. खाडे, विनय पाटील, सी. आर. गोडसे, माजी महापौर सई खराडे, विभागप्रमुख, स्टाफ, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

12 SEP 2026
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘जेन झी’नी इनोव्हेशन, स्टार्टअप निर्मिती करावी

## कुलगुरू डॉ. कामत : न्यू इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये ‘दीक्षारंभ’

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

जेन झी ही उपजतच बहुगुणी आहे, मल्टिटास्किंग करू शकतात. त्याचा वापर त्यांनी नवनिर्मिती व स्टार्टअपसाठी करावा. टीमवर्कसाठी भावनांक व बुद्ध्यांक वाढवावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांनी केले. उचगाव येथील न्यू इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजीमधील डिप्लोमा व डिग्री इंजिनिअरिंगच्या नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांच्या ‘दीक्षारंभ’ या कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.



या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उद्योजक संजय पेंडसे यांनी ‘विकसित भारत २०४७’ या उद्दिष्टपूर्तीसाठीच्या प्रभावशाली क्षेत्रांमधील अद्ययावत तंत्रज्ञान याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या संस्थेने समाजाला दिशा देणारे विचारवंत, कुशल तंत्रज्ञ, अधिकारी दिले आहेत. ती परंपरा तुम्ही पुढे न्या, असे आवाहन चेअरमन डॉ. के. जी. पाटील यांनी केले. कोल्हापूरचा अभिमानास्पद औद्योगिक वारसा पुढे नेण्याचे काम विद्यार्थ्यांनी करावे, असे प्रतिपादन अध्यक्ष बी. जी. बोराडे यांनी केले. एनआयटीचे प्राचार्य डॉ. संजय दाभोळे यांनी संस्थेचा इतिहास, तसेच एनआयटीमधील इनोव्हेशन, स्टार्टअप व कौशल्य विकास याचे धोरण सांगितले.

प्रारंभी ‘आर अँन्ड डी न्यूजलेटर’चे प्रकाशन आणि इनोव्हेशन क्लबच्या लोगोचे अनावरण झाले. गुणवंतांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक प्रा. मोहन शिंदे, सूत्रसंचालन प्रा. संग्रामसिंह पाटील यांनी केले. आभार प्रा. सुहासचंद्र देशमुख यांनी मानले. संस्थेचे व्हाईस चेअरमन डी. जी. किल्लेदार, खजानीस वाय. एस. चव्हाण, संचालक वाय. एल. खाडे, विनय पाटील, सी. आर. गोडसे, माजी महापौर सई खराडे, स्वाती निगडे, पी. सी. पाटील, फार्मसी प्राचार्य डॉ. रवींद्र कुंभार, डॉ. व्ही. एम. पाटील आदी उपस्थित होते.

1 2 SEP 2026

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नवीन अभ्यासक्रमांसाठी ३० सप्टेंबरपर्यंत प्रस्ताव

## नवीन विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकड्यांसह संशोधन संस्थांना संधी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शैक्षणिक वर्ष २०२७-२८ साठी महाविद्यालयांना नवीन अभ्यासक्रम, नवीन विषय, नवीन विद्याशाखा आणि अतिरिक्त तुकड्या सुरू करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. शिवाजी विद्यापीठाने यासाठी महाविद्यालयांकडून प्रस्ताव मागविले असून, ३० सप्टेंबर २०२६ ही प्रस्ताव सादर करण्याची अंतिम मुदत निश्चित केली आहे. त्यामुळे नवीन अभ्यासक्रम सुरू करू इच्छिणाऱ्या महाविद्यालयांसाठी ही महत्त्वाची संधी ठरणार आहे.

शासनमान्य महाविद्यालयांनी नवीन अभ्यासक्रम, विषय, विद्याशाखा तसेच अतिरिक्त तुकड्यांसाठीचे प्रस्ताव न्यू कॉलेज परमिशन सिस्टम या ऑनलाइन प्रणालीद्वारे सादर करायचे आहेत. प्रस्तावासोबत आवश्यक शुल्कही कार्यालयीन वेळेत निर्धारित मुदतीत जमा करावे लागणार आहे.

### काही प्रस्तावांसाठी ऑफलाइन पद्धत

नवीन सॅटेलाइट केंद्र सुरू करणे, संशोधन संस्थेला मान्यता मिळविणे, खासगी कौशल्य शिक्षण प्रदाता व परिसंस्था सुरू करणे, पीएच.डी. प्रयोगशाळेला मान्यता, महाविद्यालयाच्या नावात बदल तसेच महाविद्यालय किंवा परिसंस्थेच्या व्यवस्थापनाचे हस्तांतरण यांसाठी मात्र ऑफलाइन पद्धतीने प्रस्ताव सादर करावे लागणार आहेत. या प्रस्तावांसाठीही ३० सप्टेंबर अंतिम मुदत आहे.

### विधि महाविद्यालयांना दिलासा

५ मार्च २०२६ रोजीच्या अधिसूचनेद्वारे तीन वर्षांचा मोराटोरियम कालावधी रद्द केला आहे. त्यामुळे अस्तित्वात असलेल्या विधि महाविद्यालयांनाही विस्ताराची संधी मिळाली आहे. नवीन अभ्यासक्रम आणि अतिरिक्त तुकड्यांशी संबंधित प्रस्ताव १८ सप्टेंबर २०२५ च्या शासन निर्णयानुसार एनसीपीएस प्रणालीद्वारे सादर करण्याचे आवाहन केले आहे.

### समाजकार्य अभ्यासक्रमांनाही संधी

समाजकार्य ही स्वतंत्र विद्याशाखा सुरू करणे, नवीन अतिरिक्त तुकड्या सुरू करणे, समाजकार्य महाविद्यालयांमध्ये स्वतंत्र विद्याशाखा व नवीन अभ्यासक्रम सुरू करण्याचे प्रस्तावही सादर करता येणार आहेत. हे सर्व प्रस्ताव कायम विनाअनुदानित तत्त्वावर ऑनलाइन पद्धतीने सादर करावे लागतील.

> "शैक्षणिक वर्ष २०२७-२८ च्या वार्षिक योजनेला शासनाची मान्यता मिळाल्यानंतर नवीन महाविद्यालयांच्या प्रस्तावांबाबत स्वतंत्रपणे सूचना करण्यात येईल. विविध अभ्यासक्रम, विषय, विद्याशाखा आणि अतिरिक्त तुकड्यांचे प्रस्ताव निर्धारित मुदतीत सादर करावेत.
>
> **डॉ. व्ही. एन. शिंदे,** कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ.

12 SEP 2026

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# हिवाळी परीक्षा अर्जांच्या मुदतीत वाढ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२६ च्या हिवाळी सत्रातील परीक्षांसाठी परीक्षा अर्ज भरण्याच्या मुदतीत वाढ देण्यात आली आहे. यापूर्वी विद्यापीठाने २७ ऑगस्टच्या परिपत्रकाद्वारे परीक्षा अर्ज स्वीकारण्याच्या तारखा कळविल्या होत्या. मात्र, काही महाविद्यालयांकडून मुदतवाढीबाबत विनंती करण्यात आल्याने विद्यार्थी हिताच्या दृष्टीने विद्यापीठाने सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे. सहायक कुलसचिव डॉ. के. ए. गुरव यांनी हे परिपत्रक सर्व संलग्न महाविद्यालये, मान्यताप्राप्त शिक्षण संस्था व विद्यापीठ अधिविभागांना पाठविण्यात आले आहे.

**सुधारित वेळापत्रक असे :** विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात अथवा पदव्युत्तर अधिविभागामध्ये १ ते २१ सप्टेंबर २०२६ या कालावधीत विनाविलंब शुल्कासह अर्ज भरावेत, विलंब शुल्कासह: २२ व २३ सप्टेंबर २०२६ रोजी विलंब शुल्कासह अर्ज स्वीकारले जातील, अतिविलंब शुल्कासह : २४ ते २९ सप्टेंबर २०२६ या कालावधीत अतिविलंब शुल्कासह अर्ज भरता येतील. मात्र २५ ते २७ सप्टेंबर या कालावधीत संगणक प्रणालीत कोणतेही काम चालणार नसल्याची नोंद विद्यापीठाने घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.

12 SEP 2026
पुढारी

# हिवाळी सत्रातील परीक्षांचे अर्ज भरण्यास मुदतवाढ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२६ हिवाळी सत्रातील परीक्षांसाठी अर्ज भरण्याच्या मुदतीत वाढ करण्यात आली आहे. काही महाविद्यालये व विद्यार्थ्यांकडून परीक्षा अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ देण्याची विनंती करण्यात आल्याने विद्यापीठाने सुधारीत वेळापत्रक जाहीर केले आहे.

विद्यार्थ्यांना महाविद्यालय अथवा पदव्युत्तर अधिविभागामध्ये परीक्षा अर्ज भरून देण्याची मुदत विनाविलंब शुल्क १ ते २१ सप्टेंबर २०२६ अशी आहे. विलंब शुल्कासह अर्ज २२ ते २३ सप्टेंबर, तर अतिविलंब शुल्कासह अर्ज २४ ते २९ सप्टेंबर २०२६ या कालावधीत करता येणार आहेत. संबंधित महाविद्यालय अथवा अधिविभागाने विद्यापीठाकडे शुल्क जमा करण्याची अंतिम मुदत विनाविलंब शुल्कासाठी २२ सप्टेंबर, विलंब शुल्कासह २४ सप्टेंबर, तर अतिविलंब शुल्कासह ३० सप्टेंबर, अशी निश्चित करण्यात आली आहे.

महाविद्यालये व अधिविभागांनी विद्यार्थ्यांच्या परीक्षा अर्जांच्या याद्या विद्यापीठाकडे जमा करण्याची अंतिम तारीख १ ऑक्टोबर २०२६ आहे.

12 SEP 2026
सकाळ

# परीक्षांचे अर्ज भरण्यास विद्यापीठाची मुदतवाढ

कोल्हापूर, ता. ११ : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबरमधील हिवाळी सत्रातील परीक्षांचे अर्ज भरण्यास मुदतवाढ दिली आहे. विलंब शुल्कासह २३ सप्टेंबर, तर अतिरिक्त विलंब शुल्कासह २९ सप्टेंबरपर्यंत परीक्षा अर्ज भरता येणार आहेत. परीक्षा व मूल्यमापन मंडळाने त्याबाबतचे सुधारित वेळापत्रक जाहीर केले. विद्यापीठाने यापूर्वी जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार परीक्षा अर्ज भरण्याची मुदत निश्चित केली होती. मात्र, काही महाविद्यालयांनी परीक्षा अर्ज स्वीकारण्याच्या तारखांना मुदतवाढ देण्याची मागणी केली होती. त्यानुसार विद्यापीठाने महाविद्यालयांना दिलासा देत सुधारित मुदत जाहीर केली.

1 2 SEP 2026

तरुण भारत

थोडक्यात

## पीएचडी प्राप्त विद्यार्थ्यांची खातरजमा करा

**कोल्हापूर :** पीएच. डी. विद्यार्थ्यांच्या तोंडी परीक्षेचे आयोजन विविध अधिविभागांमार्फत केले जाते. त्यानंतर नियमानुसार तोंडी परीक्षेचे अहवाल कुलगुरू किंवा प्र–कुलगुरू यांचेकडे मान्यतेसाठी पाठवले जातात. सदर मान्यतेनंतरच पीएच.डी. चा अधिकृत निकाल जाहीर करण्यात येतो. तथापि, काही विद्यार्थी पीएच.डी. तोंडी परीक्षेनंतर निकाल जाहीर होण्यापूर्वीच वर्तमानपत्रांतून पीएच.डी. पदवी प्राप्त केल्याची बातमी प्रसिद्धीस देत असतात. तेव्हा संबंधित वृत्तपत्रांनी निकाल जाहीर झाल्याची खात्री करूनच, निकाल तपासून आपल्या वृत्तपत्रांमध्ये संबंधित विद्यार्थ्यांची पीएच.डी. प्राप्त झाल्याची बातमी प्रसिद्ध करावी, असे आवाहन पीजी–बीयुटीआर विभागाकडून करण्यात आले आहे.

1 2 SEP 2026

जनसंपर्क कक्ष
पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Estd 1962 "A++" Accredited by NAAC(2021) WITH CGPA3.52

# SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

## E-Tender Notice No.218_SUK_2026-27

Shivaji University invites online tenders for **Supply of Paper as per schedule 'A'.** Relevant tender documents are available on web-site **http://mahatenders.gov.in"**. Interested parties should submit online tenders accordingly by getting their firm's name registered with above said URL.University reserves Right of Negotiation and also to accept or reject any or all tenders without assigning any reason. **Last date of Tender submission dt.29 /09 /2026 upto 5-00 p.m.**

**SU/Stores**
**Date :- 12 /09 /2026**

**Dr. V. N. Shinde**
**Registrar**

12 SEP 2026 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Estd 1962 "A++"Accredited by NAAC(2021) WITH CGPA3.52

# SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

## E-Tender Notice No.218_SUK_2026-27

Shivaji University invites online tenders for **Supply of Paper as per schedule 'A'**. Relevant tender documents are available on web-site **http://mahatenders.gov.in"**. Interested parties should submit online tenders accordingly by getting their firm's name registered with above said URL.University reserves Right of Negotiation and also to accept or reject any or all tenders without assigning any reason. **Last date of Tender submission dt.29 /09 /2026 upto 5-00 p.m.**

**SU/Stores**
**Date :- 12 /09 /2026**

**Dr. V. N. Shinde**
**Registrar**